25

इंग्रजी लघुलेखक [निवड श्रेणी, उच्च श्रेणी व निम्न श्रेणी] व इंग्रजी टंकलेखक यांना मराठी लघुलेखन/ मराठी टंकलेखन परीक्षा सक्तीची करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक-टंलप्र-१०८ /सीआर-३४४/२०-ब,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक ६ मे, १९९१.

## निर्णय

शासकीय कर्मचाऱ्यांकरिता मराठी टंकलेखन व लघुलेखन प्रशिक्षण योजना शासनाने कार्यान्वित केली होती व एतदर्थ मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रोत्साहनात्मक बक्षीस देण्यात येत होते. शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की अशी प्रोत्साहनात्मक बक्षीसे देवून देखील इंग्रजी लघुलेखक व टंकलेखक यांचेकडून पुरेसा प्रतिसाद मिळाला नाही. यास्तव या बाबतीतील सध्याचे सर्व आदेशांचे अधिक्रमण करून शासन आता असे आदेश देत आहे की, महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील इंग्रजी लघुलेखक [निवड श्रेणी, उच्च श्रेणी व निम्न श्रेणी] व इंग्रजी टंकलेखक यांनी प्राप्त करावयाच्या मराठी लघुलेखन/मराठी टंकलेखन अर्हताबाबतची नियमावली भारतीय संविधानाच्या अनुच्छेद-३०९ च्या परंतुकान्वये अधिसूचनेच्या स्वरूपात राजपत्रात प्रसिध्द करण्यात यावी. त्यानुसार सदर अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात येत आहे व प्रसिध्द केल्यानंतर आवश्यक त्या प्रती सर्व संबंधितांना शासन मुद्रणालय व लेखनसामग्री यांचेकडून निर्गमित करण्यात याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,


जिल्हाधिकारी कार्यालय,
रत्नागिरी.
13 SEP 1991
आस्थापना शाखा


अ. व. आम्बेरकर,
उप सचिव,
महाराष्ट्र शासन.

प्रति,

१] राज्यपाल यांचे सचिव,
२] मुख्य मंत्री यांचे खाजगी सचिव,
३] सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
४] प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई [पत्राने],
५] प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई [पत्राने],
६] सचिव महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई [पत्राने],
७] लोकायुक्त / उपलोकायुक्त, मुंबई [पत्राने],
८] सर्व विभागीय आयुक्त,